दिनांक :– २९.०५.२०१९.

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक पी.एस.राऊत, कृषी सहाय्यक, कृषी विभाग कार्यालय गोळेगाव, ता.औंढा (ना.) जि. हिंगोली वर्ग–३,यांनी लाचेची मागणी केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि. १५.०५.२०१९ रोजी तक्रार दिली की, त्यांची नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अतर्गत कृषी संजीवनी समितीमध्ये सदस्य म्हणुन निवड पी.एस.राऊत, कृषी सहाय्यक यांनी केली म्हणुन पी.एस.राऊत, कृषी सहाय्यक हे त्यांचेकडे १,५००/– रू. च्या लाचेची मागणी करीत असल्याबाबत ला.प्र.वि हिंगोली कार्यालयात तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी वरुन आरोपी लोकसेवक पी.एस.राऊत, कृषी सहाय्यक यांनी तक्रारदाराकडे २,१००/–रू. च्या लाचेची मागणी करुन ती लाचेची रक्कम स्वीकारण्यास सहमती देवून लाच मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्री.संजय लाटकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षीका, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री रविंद्र थोरात यांनी पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री आढाव, पोहेकॉ श्री विजय उपरे, पोना श्री महारुद्र कबाडे, श्री विनोद देशमुख, श्री संतोष दुमाने, पोकॉ श्री प्रमोद थोरात, श्री अवि किर्तनकार, यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.१०६४**, दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,
श्री संजय लाटकर, पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, लाप्रवि नांदेड.
मोबाईल कमांक. ९९२३०२८१२२, दुरध्वनी क ०२४६२–२५५८११.
मोबाईल कमांक ९८२३२१५१९५, ९९२००४९२३२ व ९९२३०४२५६५.

Scanned by CamScanner